**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.२०)**

**शुक्रवार दिनांक ९ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. **पाकिस्तान सीमेवरच्या तणावासंदर्भात भारतात सरकारची वेगवान पावलं/ पाकिस्तानचे हल्ले संरक्षण दलांनी केले निष्फळ.**
2. **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला राज्यातील सुरक्षा, सज्जतेचा आढावा; अत्यावश्यक सेवेतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या रजा रद्द.**
3. **सीमाभागातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आयपीएल क्रिकेट सामने आठवडाभरासाठी स्थगित.**
4. **वर्ध्याचे पालकमंत्री डॉ . पंकज भोयर यांच्या हस्ते वायगावच्या हळदीची खेप दुबईला रवाना.**

सुरक्षा बैठक

पाकिस्तान बरोबरच्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सरकारने वेगवान पावलं उचलली आहेत. विविध स्तरांवर संरक्षण विषयक मुद्यांवर चर्चा होत असून महत्त्वाचे निर्णय घेतले जात आहेत. देशाच्या पश्चिम सीमेवरची सशस्त्र दलांच्या सज्जतेचा आढावा घेण्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक घेतली. संरक्षण दलांचे प्रमुख जनरल अनिल चौहान, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी, हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह आणि संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह या बैठकीला उपस्थित होते.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची आज सुरक्षा स्थितीचा आढावा घेण्यासाठी नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक घेतली. राष्ट्रीय संरक्षण सल्लागार अजित दोवाल, केंद्रीय विमानतळ सुरक्षा दलाचे महासंचालक केंद्रीय गृहखात्याचे सचिव आणि इतर वरिष्ठ अधिकारी बैठकीत उपस्थित होते. पाकिस्तानबरोबरच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर देशात जीवनावश्यक वस्तू आणि सेवांचा पुरवठा सुरळीत रहावा याकरता केंद्रसरकारने सर्व प्रकारची तयारी केली आहे. देशातल्या बँका आणि इतर वित्तीय संस्थांच्या सायबर सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज बैठक बोलावली आहे. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांची एटीएम, रोकड जमा करण्याची आणि काढून घेण्याची यंत्रं तसंच सर्व डिजिटल सेवा पूर्णपणे कार्यरत असल्याची माहिती संबंधित बँकांच्या व्यवस्थापनानं दिली आहे. केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी आज आरोग्य आणि औषधोपचार सुविधांची सज्जतपाहण्याकरता उच्चस्तरीय बैठक घेतली.

लष्करी कारवाई पत्रकार परिषद

पाकिस्तानी ड्रोनने आंतरराष्ट्रीय सीमा तसेच नियंत्रण रेषेजवळ भारताच्या हवाई क्षेत्रात घुसखोरी करून भारतीय सैन्याच्या ठिकाणांना लक्ष करण्याचा तसेच त्यांची रेकी

करण्याचा प्रयत्न केला परंतु भारतीय हवाई दलाने त्याला जोरदार प्रत्युत्तर दिले. अशी माहिती भारतीय लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी यांनी आज नवी दिल्लीत संध्याकाळी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली . याप्रसंगी विंग कमांडर व्योमिका सिंग आणि भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री उपस्थित होते. पाकिस्तानने ड्रोनच्या रेकीसाठी नागरी विमान वाहतुकीचा एक ढाल म्हणून वापर केला.पाकिस्तानची लाहोर ते कराची ही विमान सेवा सुरूच होती . काल पाकिस्तानी सैन्याने मोठ्या क्षमतेच्या तोफ शस्त्रास्त्रांसह भारत पाकच्या सीमेवर असणाऱ्या काही गावांवर सुद्धा हल्ला केला अशी माहिती या पत्रकार परिषदेत देण्यात आली

मुख्यमंत्री सुरक्षा आढावा

भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते.मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करण्याचे आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करण्याचे निर्देश दिले . पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिग ऑपरेशन करण्याच आणि गस्त अधिक चोख करण्याचेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले असूनराज्यातील महत्वाच्या पदांवर विशेषतः आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागांतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत.

खनिज चर्चासत्र

भारतीय खाण ब्युरो (IBM), राष्ट्रीय खनिज विकास महामंडळ (NMDC) च्या सहकार्याने आज सकाळी हॉटेल रेडिसन ब्लू, नागपूर येथे "खाणीतील कचऱ्यापासून दुर्मिळ खनिजे काढणे - संधी आणि आव्हाने" या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राला संबोधित करतांना भारतीय खाण ब्युरो आयबीएम नागपूरचे महा नियंत्रक डॉ पी . एन . शर्मा यांनी सांगितल की देशात मोठ्या प्रमाणात जमा होत असलेला इलेक्ट्रॉनिक कचऱ्या पासून क्रिटिकल अर्थ मिनरल्स मिळवता येतात.

*Part is that the low hanging and the short term goal can be the recycling and reuse of all these critical minerals, specifically the electronic gadgets which we use.A huge electronic waste which is generated in our country is an important source of all such critical methods.We can create an ecosystem very quickly in a short term.*

देशांमधील खाणींच्या माध्यमातून उत्खनन झाल्यानंतर उरलेल्या अविशिष्ट कचऱ्यापासून क्रिटिकल अर्थ मिनरलचे खनन होत असते . या क्रिटिकल अर्थ मिनरल च्या उत्खननामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला जात असून या खनिजांपासून उत्तम प्रतींचे धातूके निर्माण होतात ज्यांचा वापर अणुऊर्जा तसेच इतर महत्त्वाच्या क्षेत्रात केला जात असल्याचं त्यांनी सांगितलं .

मत्स्यशेती

राज्य शासनाने मच्छीमारांना कृषीचा दर्जा देऊन शेतकऱ्यां प्रमाणे नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मत्स्यशेती विकसित करणे करिता शीतगृह सुविधेसाठी अनुदान, मच्छीमार अपघात गट विमा योजना नैसर्गिक नुकसान भरपाई सह विविध योजना राज्य शासन राबवणार आहे त्यामुळे सहाजिकच यात रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतील असे असताना बुलढाणा जिल्हयामध्ये सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय,श्री. सुरेंद्र गावडे यांच्या मार्गदर्शनात अभिनव प्रयोग राबवून मत्स्य व्यावसायिकांना मोठा रोजगार उपलब्ध करून देण्यात येत आहे.याबाबत मत्स्यव्यवसाय आयुक्त. सुरेंद्र गावडे अधिक माहिती देत आहेत

***बुलढाणा जिल्ह्यामध्ये एकूण 105 पाटबंधारे तलाव, 625 जिल्हा परिषदचे तलाव आणि 50 ग्रामपंचायती नगरपालिकेचे तलाव असे आहे. तलावाचे एकूण क्षेत्र मिळून चौदा हजार अठेचाळीस हेक्टर क्षेत्र हे मत्स्य व्यवसायासाठी उपलब्ध आहे. जिल्ह्यामध्ये एकूण 181 मच्छीमार सहकारी संस्था आहेत. मत्स्यमार सहकारी संस्था तसेच खासगी ठेकेदार यांना पाच वर्षाकरिता अटीशर्तीच्या आधारावर ठेक्याने दिले जातात. आता या तलावांमध्ये वीजपुरवठा करण्यासाठीसुद्धा आपला जिल्हा स्वयंपूर्ण आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत पतदर्शक कोळंबी संवर्धन प्रकल्प या वर्षी राबवण्यात आला.***

मेहकर तालुक्यातील कोराडी तेथील शासकीय मस्यबीज केंद्र अंतर्गत मासळी बीज पुरवठा ,झिंगा उत्पादन आणि प्रशिक्षण यासह अनेक अभ्यासपूर्ण बाबी या कार्यालया अंतर्गत सुरु करण्यात आल्याने अनेक हजारो बेरोजगार युवक आता मस्यशेतीकडे वळत आहेत .

आयपीएल स्थगित

भारत आणि पाकिस्तान दरम्यान वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं आयपीएलचे आजपासून पुढचे सर्व सामने आठवडाभरासाठी स्थगित केले आहेत. त्यानंतर परिस्थितीचा आढावा घेऊन संबंधितांशी चर्चा करून स्पर्धेचं पुढचं वेळापत्रक जाहीर केलं जाईल, असं बीसीसीआयनं स्पष्ट केलं. सद्यस्थितीत बीसीसीआय

देशासोबत खंबीरपणे असून, भारत सरकार, सशस्त्र दल आणि देशवासीयांच्या पाठीशी असल्याचं पत्रकात म्हटलं आहे.

थेट प्रक्षेपण

भारत आणि पाकिस्तान यांच्यातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, वृत्तवाहिन्या, डिजिटल मंच आणि वार्ताहरांनी भारतीय सशस्त्र दलांच्या हालचाली आणि कारवायांचं थेट प्रक्षेपण करू नये, अशी सूचना संरक्षण मंत्रालयानं आज केली. अशी संवेदनशील आणि गोपनीय माहिती प्रसारित केल्यामुळे सशस्त्र दलांच्या कामात अडथळा येऊन नागरिकांचा जीव धोक्यात येऊ शकतो, असं संरक्षण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.दरम्यान, पाकिस्तानच्या या हल्ल्यामुळे राजस्थान, पंजाब, जम्मू काश्मीर, चंदीगढ, हिमाचल प्रदेशसह काही राज्यांमध्ये विमान उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. देशभरातले विमानतळ बंद केल्याच्या वृत्ताचं मात्र नागरी उड्डयन मंत्रालयानं खंडन केलं आहे. पाकिस्तानकडून आज पुन्हा ड्रोन हल्ल्याची शक्यता लक्षात घेऊन चंदीगढमध्ये सुरक्षा यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. नागरीकांना घरातच राहण्याची सूचना हवाई दलानं केली आहे.

पाकिस्तान आर्थिक कर्ज

पाकिस्तान सरकारनं त्यांच्या आंतरराष्ट्रीय भागीदारांकडे अधिक कर्ज देण्यासाठी आवाहन केलं आहे. पाकिस्तानात उसळलेला संघर्ष आणि शेअर बाजारात होणारं नुकसान या पार्श्वभूमीवर अर्थ विभागानं समाजमाध्यमावर केलेल्या पोस्ट करत आंतरराष्ट्रीय संस्थांना मदत करण्याचं आवाहन केलं आहे.

वायगाव हळद

वर्धा जिल्हयातील समुद्रपुर तालुक्यात उत्पादीत होत असलेल्या वायगाव हळदीमध्ये विशेष गुणकारी तत्व आहे. त्यामुळे या हळदीला विशेष मागणी असते. भौगोलिक नामांकन प्राप्त या हळदीला लवकरच देश आणि जागतिक पातळीवर चांगली बाजारपेठ उपलब्ध होईल. या हळदीला 'प्रमोट' करण्यासाठी अपेडा, ईफिक्की सारख्या संस्थांची मदत घेऊ. शेतकऱ्यांना पॅकेजिंग, मार्केटींगचे चांगले प्रशिक्षण उपलब्ध करून देऊ, अस पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी आज सांगितल.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आत्मा, अपेडा, ईफिक्की, स्मार्ट प्रकल्प आणि युनिव्हर्सल एक्सपोर्टच्या वतीन वायगाव हळदीची दुबई इथं निर्यात, विपणन आणि प्रसिध्दी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी पालकमंत्री बोलत होते. वायगाव हळद जास्तीत जास्त निर्यात करण्यासोबतच विपणन साखळीतील मध्यस्थ कमी होणे देखील आवश्यक आहे. शेतकऱ्यांना अधिक भाव मिळण्यासाठी थेट शेतकरी ते ग्राहक असा प्रयत्न करू, असे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले.सभागृहातील कार्यक्रमानंतर पालकमंत्र्यांच्यां हस्ते हिरवी झेंडी दाखवून दीड टन ओल्या हळदीची खेप नागपूरकडे रवाना करण्यात आली. तेथून हळद विमानाने दुबईला जाणार आहे.

खेलो इंडिया

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत काल महाराष्ट्रानं पदकांचं अर्धशतक पूर्ण करत पदकतालिकेतलं आपलं अव्वल स्थान कायम राखलं. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आतापर्यंत २० सुवर्ण, १८ रौप्य आणि १६ कांस्य अशी एकंदर ५४ पदकं पटकावली आहेत.

हवामान

विदर्भातील पुढील काही तासात चंद्रपूर, यवतमाळ, वाशीम, अकोला जिल्हयांतील तुरळक ठिकाणी विजांसह मेघगर्जना,सोसाट्याच्या वाऱ्यासह आणि अतिशय हलक्या ते हलक्या पावसाची शक्यता आहे.दरम्यान आज सर्वात जास्त तापमानाची नोंद नागपूर येथे 39 अंश सेल्सिअस करण्यात आली आहे.

*****